# ‘राजधर्म’ राजकीय अधर्माच्या संस्कृतीचे चित्रण

**रमेश साळुंखे.**

देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर जि, कोल्हापूर.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259613

## ABSTRACT:

माणूस आणि राजकारण यांचे नाते पुरातन काळापासूनचे आहे. इतरांशी वागण्याबोलण्याची, वर्तनव्यवहाराची प्रत्येक चाल ही एकप्रकारचे राजकारण असते. राजकारणाच्या दोन बाजू असतात. विवेकनिष्ठ, मूल्ययुक्त राजकारण आणि विवेकाला तिलांजली देऊन अविवेकाला खुलेआम शरण गेलेले मूल्यह्ऱ्हासी राजकारण. आजकाल केवळ देशपातळीवरच नव्हे; तर जागतिक पातळीवर अपवाद सोडला तर हे दुसऱ्या प्रकारचे राजकारण आपणास भगभगीतपणाने दिसते आहे. अशा राजकारणापासून सर्वसामान्य माणसाने कितीही अंतर राखून राहतो असे म्हटले तर ते केवळ अशक्य असते. पर्यायच नाही अशी गत करून ठेवली आहे; या वर्तमानकालीन राजकारणाने. या अर्थाने पाहू जाता राजकारण हे समाजजीवनातील एक अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. राजकारणाची सावली आपण कितीही म्हटले तरी वेगवेगळया माध्यमातून आपल्यावर पडल्याशिवाय राहात नाही. अशा सुष्ठ आणि दुष्ठ राजकारणाचे चित्रण वैचारिक आणि ललित साहित्यातही उमटत असते. अर्थातच ते अल्प अशा स्वरूपाचे आहे. मराठी साहित्यात राजकारणाचे प्रतिबिंब अल्पांशाने पडले आहे, हे मान्यच करावे लागते. राजकारणाची पार्श्वभूमी, राजकारणसमाजकारणाचे आकलन लेखकाजवळ असेल तर त्याच्या साहित्यकृतीत राजकारणाचे यथायोग्य चित्रण येऊ शकते, असे म्हणता येते. त्या अल्पामध्ये उल्लेख करता येईल अशी डॉ. विनोद गायकवाड यांची ‘राजधर्म’ ही कादंबरी आहे. ‘सत्तासंघर्ष’ आणि ‘मूल्यसंघर्ष’ यांच्यातील ताणाचे चित्रण वास्तवाशी समांतरपणे जात ही कादंबरी करते.

## KEYWORDS:

राजकारण, राजधर्म, मूल्यसंघर्ष, राजकीय अधर्म, डॉ. विनोद गायकवाड.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळखंडात आपल्या देशात अनेक विचारधारा, पक्ष, संघटना, चळवळी इत्यादी जोरकसपणे झाल्या. मार्क्सवादी, गांधीवादी, समाजवादी, हिंदुत्ववादी इ. विचारसरणींची उदाहरणे या संदर्भात देता येणे शक्य आहे. या विचारसरणींमुळे कृतिप्रवण होऊन मोठमोठ्या चळवळी निर्माण झाल्या; हा इतिहास आहे. विचारसरणींना बळ देण्यासाठी समर्थकही तयार होतात. समर्थक विचारसरणींच्या परंपरेत भर घालतात. तथापि विचारप्रणालीत मूलभूत बदल घडून येत नाहीत. राजकीय क्षेत्रात अनेक विचारधारांचे प्रवाह सांगता येतात. निष्ठा, आस्था, विश्वास आणि समर्पण या मूल्यांवर आधारलेल्या वैचारिक बैठकीला 'विचारधारा' म्हणता येईल. या गोष्टींनी तत्कालीन समाजजीवन ढवळून काढले होते. समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यात पडते हे मान्य केले तर राजकारणाचे चित्रणही साहित्याचा विषय होणे अपरिहार्य होते. या पार्श्वभूमीवर विचार करता 'राजधर्म' या कादंबरीविषयी आपणास काही एक मांडणी करता येणे शक्य आहे.

या कादंबरीचे कथानक सिनेमॅटिक पद्धतीने आले आहे. एखादा चित्रपट पहावा तसे कथानक 'राजधर्म' या कादंबरीमध्ये उलगड जाते. अभय हा एका सुसंस्कृत राजकीय वातावरण असलेल्या कुटुंबातील मूल्ययुक्त संस्कार असलेला तरूण आहे. राजकीय सत्तेचा वापर समाजाच्या कल्याणासाठी, अशिक्षितांना, पद दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी तो करीत असतो. लहानपणापासून राजकीय संस्कार अभयवर झाले आहेत. समाज आणि समाजातल्या गतीविधी तो पाहतो आहे. या अनुषंगाने या कादबरीत आकणीची कथा आणि मल्लाप्पा आंबीची कथा सुरूवातीसच येते. त्यामुळे अभयला राजकारण किती पवित्र असते, आणि आपणही राजकारण करावे असे त्याला वाटू लागते. एका राजकीय पक्षाद्वारे उत्तम कामकाज करावे, याकरिता तो भरतो आणि निवडणुकीस उभा राहतो. या अनुषंगाने तो बास्तवातले राजकारण जवळून पाहतो. आजचे राजकारण हे विधिनिषेधशून्य, सवंग, स्वार्थी आणि सत्ता व मत्ता यासाठी लालचावलेले आहे, त्यामुळे हे सगळे भ्रष्ट राजकारण आपण फेकून द्यावे आणि या सर्वांपासून अलिप्त व्हावे असे त्याला वाटते, तथापि तो समकालीन स्वार्थांध राजकारण टाळू शकत नाही. राजकारणाला उत्तरोत्तर बळी पडून मूल्यभ्रष्ट होतो. कादंबरीचे कथानक हे असे अल्पस्वल्प वाटत असले तरी डॉ. विनोद गायकवाड

यांनी हे कथानक अत्यंत रंजकपणे रचलेले आहे. उत्कंठा जागृत करणारे कथानक या कादंबरीत मोठ्या कौशल्याने लेखकाने या कादबंरीत लेखकाने मांडले आहे.

राजकारणाच्या अनुषंगाने डॉ. विनोद गायकवाड यांनी आजच्या समाजाचे वास्तव रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. विकास प्रगती जरी आपल्याला आजच्या समाजाची दिसत असली तरी या झगमगाटाच्या खाली आपला समाज किती अधोगतीला गेला आहे, याचे चित्रण करणे हा या कादंबरीचा उद्देश असावा; असे वाटते. या कादंबरीत आकणी या स्त्रीची कथा सांगताना आपण पहात असलेली स्त्रीसुधारणा केवळ कागदावरच आहे. प्रत्यक्षात स्त्रियांना आजही किती दास्यातून जावे लागते; हे दिसून येते. शिवाय मल्लाप्पाला त्याच्या घरातूनच होणारी मारहाण ही उदाहरणे लेखकांनी प्रातिनिधिक म्हणून रेखाटली आहेत. शिवाय अशा अनेक उदाहणांमधून अभयने या दोनही प्रसंगांमधून घेतलेली भूमिका त्याचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यात मदत करणारी ठरते. जिवावर उदार होऊन अभय मल्लाप्पा यांना मदत करतो. बाबा अभवला म्हणजेच आपल्या नातवाला शस्त्र बाळगायला सांगतात. अभय आखणीला आपल्या शेतात काम देतो. घरी दुधाचा रतीब लावायला सांगतो.

या कादंबरीच्या माध्यमातून कादंबरीकाराने सामाजिक प्रश्नांचा चांगला उहापोह केला आहे. व्यसनाधीनतेमुळे आपला समाज किती पोखरलेला आहे, याचेही चित्रण या कादंबरीत येते. पंढरीच्या वारीच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांच्या दुःखाचे चित्रण या कादंबरीत येते. या प्रश्नांवर तोडगा म्हणून गावात व्यायामशाळा बांधली जाते, उद्धाटनास एका प्रसिद्ध सिनेकलावंताला आणले जाते. हे सारे सामाजिक कार्य करीत असताना अभय हे व्यक्तिमत्त्व एक आदर्श राजकारणी म्हणून समाजासमोर येऊ लागते. आपणही राजकारणात सक्रीय व्हावे. समाजाचे ऋण फेडावे. दुःखितांच्या व्यथा, वेदनांवर फुंकर घालावी असे वाटते अभयला वाटते. या अशा उदात्त हेतूने आपणसही राजकारणात प्रवेश करावा, असे त्याला वाटते.

अभयचा राजकारणात प्रवेश सुरू होतो आणि कादंबरी लेखनाचा खरा उद्देश वाचकांच्या नजरेसमोर येऊ लागतो. राजकारणाची काळी

बाजू विस्ताराने या कादंबरीत येऊ लागते. स्वातंत्र्योत्तर विशेषतः गेल्या वीस पंचवीस वर्षात राजकारणाने राजकीय, सामाजिक क्षेत्रात कसा तळ गाठलेला आहे याचे चित्रण अत्यंत विस्ताराने या कादंबरीत येते. 'बेटा समाजकारण म्हणजे देवपूजा आणि राजकारण म्हणजे स्वार्थपूजा' असे कादंबरीतल्या बाबांना झालेले राजकारणाचे दर्शन ते अभयला देऊ पाहतात. अभयही त्याच समाजोद्धाराच्या वाटेने वाटचाल करायचे असे ठरवतो. राजकारण आणि अर्थकारण यातला समन्वय साधण्याचा प्रयत्न तो करतो. राजकीय हेतूच्या आड येणाऱ्या गुंडाला अद्दलही घडवतो. म्हणजेच आजच्या राजकारणात मूल्ययुक्त माणसाने कसे असावे, याची पुरेपूर जाणीव असणारे हे व्यक्तिमत्त्व आहे. पण अशा माणसाची राजकारण दशा करते. सत्वयुक्त माणसाचे सामाजिक, राजकीय इतकेच नव्हे तर नैतिकतेच्या पातळीवरही कशी परवड होते; याचे अस्वस्थ करणारे चित्रण ही कादंबरी करते.

कोणतीही निवडणूक चारित्र्यवान, चळवळीच्या खंद्या पुरस्कर्त्याला लढणे कसे मुश्किल असते; याचे वास्तव चित्रण ही कादंबरी करते. पेड न्यूज छापणारे पत्रकार, अर्थसत्ता आणि धर्मसत्ता यांच्यातील छुपा समन्वय, राजकीय पक्षाला विकली गेलेली समाजमाध्यमे, लाचखोरी, खोटारेडेपणा, स्वार्थ हे सारेकाही या कादंबरीत तपशीलवारपणे आले आहे. या सर्व गदारोळात पोसले गेलेले गुंड समाजाला उपद्रव देऊ लागतात. अशा एका गुंडालाही अभय चांगलीच अद्दल घडवितो. समाजात स्वतःचे आदर्श स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

अधोगतीला गेलेल्या वातावरणात निवडणूक लढवायची तर तत्त्वनिष्ठ माणसाला काय करावे लागते; याचे विदारक चित्र ही कादंबरी वाचकांच्या नजरेसमोर उभी करते. अभय मात्र अशाही परिस्थितीत म्हणत असतो, 'निवडणूक जिंकायची तर पैसे लागत नाहीत. प्रेम लागते. कर्तृत्व लागते. निष्ठा लागते. नैतिकता लागते. शील लागते आणि गोरगरीब जनतेचे आशीर्वाद लागतात.' पण हा अभयचा भ्रमनिरास ठरतो. 'राजकारण हे रोगकारण आहे.' या विधानाचा त्याला लवकरच प्रत्यय येतो. पक्षातर्फे तिकीट मिळाल्यावर इतर पक्ष ज्या अधःपतनाला जातात, हे पाहून वर्तमान राजकारणाचा विद्रुप चेहराच जणू काही या कादंबरीत या लेखकाने चित्रदर्शीपणाने मांडला आहे. राष्ट्रीय लोकतंत्र

पक्षाचे तिकीट अभयला मिळते. अभयचा प्रचारही जोरदारपणे पण सुसंस्कृतपणे चाललेला असतो. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी इतर उमेदवार विविध प्रकारची प्रलोभने दाखवतात. अशा प्रसंगांचे अगदी विस्ताराने चित्रण डॉ. विनोद गायकवाड यांनी केले आहे. विविध पक्षाचे उत्साही कार्यकर्ते मतदारांना मिक्सर, भांडी, कुकर, साड्या, दारू, मटण यांचे वाटप करतात. भररमसाठ पैसे वाटतात, संत भोजने घालतात, तिर्थयात्रा करतात इतकेच नव्हे; तर अभयच्या चारित्र्यावर शिंतोंडे उडवण्याचाही प्रयत्न करतात. हे सारे काही आजच्या मतदारांना ठाऊक नाही असे नाही. निवडणूक प्रचाराच्या हेतून विनोद गायकवाड यांनी केलेले हे चित्रण वस्तुस्थितीला धरून आहे.

राजकारणाची काहीशी पार्श्वभूमी असल्यामुळे आणि समाजसेवेचे काही काम केले असल्यामुळे अभय सदरची ही निवडणूक जिंकतो. राजकारणाच्या या अशा छिन्नभिन्न झालेल्या वातावरणात विवेकाने वागणारी माणसे जिंकत नसतात, त्यांना पद्धतशीरपणे पराभूत केले जाते. राजकारणात कुणी कुणाचा मित्र नसतो वा शत्रूही नसतो. राजकारणाची खुर्ची पटकाविण्याच्या हेतूने चांगल्या माणसाला निष्ठरपणे दूर फेकले जाते, हे वास्तव असतानाही अभय निवडणूक जिंकतो; हे खरे तर धक्कादायक आहे. आजच्या राजकीयसामाजिक स्थितीगतीत कवी कल्पना ठरावी, असा हा निकाल. तरीही लेखकाने अभयचे यश त्याच्या पदरात घातले आहे. कदाचित अशी माणसे निवडणूकीच्या रिंगणात जिंकली तरीही हे राजकारण अशा माणसांची जी काही वाट लावायची असते, ती लावतेच असा संदेश कादंबरीकाराला द्यावयाचा या हेतूने अभयचे निवडणूक जिंकणे लेखकाने वाचकांसमोर सादर केले असावे. अभयचे या पुढील वाटचालीत जे काही व्हावयाचे होते ते तसेच घडते.

आजकालच्या बहुतांश समाजाभिमूख विचार करणाऱ्या राजकारण्यांचे राजकारणात ते यशस्वी झाले; तर पुढे जे काय होते, तेच अभयच्यापुढेही निष्ठूरपणाने वाढून ठेवलेले आहे. अभय जिंकल्यानंतर बाबा पंढरीच्या पांडुरंगापुढे व्यवस्था बदलाचे सामर्थ्य मागतात डोळ्यात आनंदाश्रू आणून पांडुरंगास म्हणतात, ‘देवा धनदांडगे, भ्रष्टाचारी हरले. राजधर्म जिंकला. आशीर्वाद टिकला. यापुढे चांगले करण्याची बुद्धी दे. व्यवस्था बदलण्याचे सामर्थ दे !!’ पण त्यांच्या या प्रार्थनेला यश येत

नाही. आता या राजकीय व्यवस्थेला देवही वाचवू शकत नाही, इतके अधःपतन आपल्या राजकीय व्यवस्थेचे झाले आहे, असे या कादंबरीचे लेखक थेटपणाने सूचित करतात.

अभय उत्साही राजकीय आमदाराचे वर्तन जसे असते, त्याप्रमाणेच अर्थातच वागण्याचा प्रयत्न करतो. आपल्याला मिळालेल्या राजकीय संस्काराची बूज उत्तमपणाने राखण्याचा प्रयत्न करतो. समाजासाठी अविरत कष्ट उपसतो. नियमांना अनुसरून शिक्षकांची बदली करणे, योग्य त्या माणसांना विविध प्रकारच्या कामाचे टेंडर देणे, विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात योग्य तो निर्णय घेणे, दारू, मटका, जुगार इत्यादी समाजविघातक गोष्टींना पायबंद घालण्याचा प्रयत्न करणे, रस्त्यांची सुयोग्य कामे करणे, महाविद्यालय, पुलांची बांधकामे करणे इत्यादी अनेकप्रकारची कामे मोठ्या धडाडीने करू लागतो. तथापि अशा माणसांना नाउमेद करण्याचे कारस्थान समांतर पातळीवर अर्थातच निवडणुकीत पराभूत झालेल्या राजकारण्याचे सुरू झालेले असते. जिरे, प्रभाकर पाटील इत्यादी मंडळी अभयच्या कामात नानाप्रकारे विघ्न आणण्याचा प्रयत्न करतात. अशांची चवचाल राजकारण्यांची मजल इतपर्यंत जाते की, अभयवर प्राणघातक हल्या करण्याही कट रचला जातो. अभयच्याच पक्षातील लोक एकमेकांचे हितसंबंध जोपासत एका मोठ्या प्रोजेक्टचा घाट घालतात. अशा प्रोजेक्टमुळे निसर्गाचं प्रचंड प्रदुषण होणार असतं. मोठ्याप्रमाणात वृक्षतोड होणार असते, गरीब शेतकऱ्यांच्या जमिनींवर अरिष्ट येणार असते. समाजविघातक ठरू शकेल अशा प्रोजेक्टला अभयने मंजूरी द्यावी, यावर एकमत होऊन अभयवर दबाव वाढवला जातो. या प्रकल्पाला प्रचंड विरोध करणाऱ्या अभयचे नंतर प्रचंड वेगाने अधःपतन होऊ लागते. तो स्नेहा कदम नावाच्या एका महिलेशी जवळीक वाढवतो, तिच्या घरी वस्ती करू लागतो, मद्यपान, अनैतिक स्त्री सहवास, सत्ता, संपत्ती अशा प्रलोभनास बळी पडतो.

राजधर्माची शिकवण तनामनात रूजविलेला अभय समाजविघातक कामे करावयासा तयार होतो. प्रकल्पाला मंजुरी देण्याच्या हेतूने तो एक हजार कोटी रूपयांच्या मोहाला बळी पडतो. राजधर्म की अधर्म या पारड्याचा विचार करता अधर्माकडे अभयचे राजकीय पारडे मोठ्या वेगाने झुकू लागते. ही अशी घसरण सात्विक वृत्तीच्या बाबांना सहन होत नाही. ते अभयला सत्य, शिव आणि

सुंदराचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न करतात. खिन्नता दाटलेल्या मनाने घरी परतलेल्या अभयला ते म्हणतात, ‘अभय तू मुख्यमंत्रांना ठणकावून सांग, की हा प्रकल्प रद्द करा म्हणून. अन्यथा या भागाला उद्ध्वस्त करण्याचे पाप आपल्या माथी येईल. आपण हा भाग सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी राजकारणात आलो. पण घडते आहे उलटेच. आपला मार्ग देवाच्या आळंदीचा आहे. चोरांच्या आळंदीचा नव्हे !!’ तथापि अशा उदात्त विचारांपासून अभय शेकडो योजने दूर गेलेला असतो. अर्थातच बाबांना हे सहन होत नाही. त्यांना नैराशाने ग्रासले जाते. अभयला या अशा सडक्या वृत्तीच्या राजकारणत आपण ढकलले; हा आपला निर्णय चुकला असे त्यांना वाटू लागते. आपला आर्दश, नैतिकता, वैचारिकता, विचारधारा सगळेकाही या गलिच्छ राजकारणात वाहून गेले असे त्यांना वाटू लागते. बाबांना या अशा गढूळ वातावरणाचा खूप मोठा धक्का बसतो, ते आजारी पडतात. शेतकऱ्याचे आपल्या जमिनी वाचविण्याकरिता मोठे आंदोलन सुरू होते. या साऱ्यांकडे दुर्लक्ष करून अभय परदेशी निघून जातो. इथेही त्याने त्याच्या कर्तव्याकडे पाठच फिरविलेली असते.

बाबा आजारी पडलेले आहेत, असा निरोप समरजीत अभयला देतो, शेकडो शेतकरी आपल्या जमिकरिता गोळीबारात मरून जात आहेत; असेही व्याकूळपणे तो अभयला फोनवर सांगू लागतो; पण स्वित्झर्लंड येथे मौजमजेला गेलेला अभय या साऱ्यांकडे दुर्लक्ष करतो. राजकारणाने त्याचा केव्हाच अभिमन्यू केलेला असतो. बाबांचे निधन होते. हे सगळे अवमूल्यन हताशपणाने पाहणारा समरजित म्हणतो, ‘बाबा संपले नाहीत, आदर्शवाद संपला, नैतिकता संपली आणि राजधर्म संपला.’

या कादंबरीचा शेवट डॉ. विनोद गायकवाड यांनी अत्यंत नाट्यमयपणाने केला आहे. एखादा चित्रपट पहावा, अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्यात कादंबरीकार कमालीचे यशस्वी झाले आहेत. कादंबरीला चित्रदर्शीपण लाभले असून या कादंबरीतल्या घटना, प्रसंग वाचकांच्या नजरेसमोर जशाच्या तशा उभ्या राहतात. सहजप्रवाही निवेदनशैली हे या कादंबरीचे आणखी एक चांगले वैशिष्ट्य आहे. कादंबरीच्या निर्मितीप्रक्रियेत तत्त्वसरणीच्या, दुर्बोधतेच्या, विचारव्यूहाच्या, राजकीय स्वायत्ततेच्या, विचारधारेच्या आणि प्रतिमा प्रतिकांच्या वापराविना राजकीय आशय सांगण्याचा प्रयत्न करणारी ही

कादंबरी आहे. सर्वसामान्य रसिक वाचकांना आजच्या राजकीयसामाजिक वातावरणाचा अंदाज यावा, यातून नागरिक म्हणून आपण कोणती बाजू घ्यावी, आपले राजकीय सामाजिक वर्तन नेमके कसे असावे याचे दिग्दर्शन या कादंबरीतून व्हावे, असा हेतू या कादंबरीतून सातत्याने ध्वनित होत राहतो. साहित्यकृती राजकीय होण्यास 'सत्तासंघर्ष' आणि 'मूल्यसंघर्ष' अत्यंत महत्त्वाचे असतात. लेखकाच्या प्रकृतिवैशिष्ट्यानुसार राजकारण साहित्याचा विषय होत असल्याने साहजिकच ते मानवी स्वरूपवैशिष्ट्याच्या पार्श्वभूमीवर अवतरत असते. कादंबरीकाराचा राजकीय अनुभव कलात्मकतेच्या पातळीवरून व्यक्त होत असल्यामुळे आणि कादंबरीही समाजजीवनाचे एक अपत्य असल्यामुळे आणि मानवी ताणतणाव राजकीय कलाकृतींचा विषय होत असतात. या अनुषंगाने विचार करता सत्तासंघर्ष आणि मूल्यसंघर्ष यासंदर्भात 'राजधर्म' ही कादंबरी समकाळाच्या राजकीय संस्कृतीचे चित्रण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करते.

## संदर्भ:


1. कऱ्हाडे सदा: सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०११.
2. खोले विलास (संपा.): महाराष्ट्रातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिंब, प्रतिम प्रकाशन, पुणे, १९९८.
3. देशपांडे स.ह.: तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी, (संपा. नरेंद्र दाभोलकर / विनोद शिरसाठ), साधना प्रकाशन, पुणे, २००९.
4. प्रधान ग.प्र.: महाराष्ट्रातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिंब, विलास खोले (संपा.), प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९८.
5. गुरू गोपाळ: तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी, साधना प्रकाशन, पुणे, २००९.


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.